# प्रकरण पहिले

## - प्रतिमा -

प्रतिमा स्वरुप, संकल्पना व व्याख्या

प्रतिमेचे काव्यगत महत्व


कवि व प्रतिमा

प्रतिमा प्रक्रिया व वर्गीकरण

प्रतिमेतील उपमा, रुपकांतर्भाव

प्रतिमेचे बदलते स्वरुप

समारोप व निष्कर्ष




कवीची प्रकटते वाणी।
विनटते दिव्य प्रतिमांनी।
साकारे मुग्ध शब्दांनी।
तेचि काव्य॥





# - प्रतिमा -

आजकाल मराठी साहित्यात विशेषत: समिक्षेमध्ये प्रतिमा या शब्दाचा वापर वारंवार होताना दिसतो. किंबहुना प्रतिमा हा समिक्षकांच्या परवलीचा शब्द होऊन गेला आहे. या संज्ञेशिवाय समिक्षा आजकाल दिसतच नाही. तथापि या संज्ञेचे नेमके स्वरुप म्हणावे तितके स्पष्ट झालेले नाही. "प्रतिमा" म्हणजे नेमके काय याचा स्पष्ट उलगडा कित्येकदा समिक्षकांनाही न झालेला दिसतो. त्यामुळेच "प्रतिमा" म्हणजे अलंकार, उपमा, रूपके की आणखी काही हा बहुचर्चित विषय आपणांस दिसतो. मराठी काव्यातील प्रतिमेच्या स्वरुपाबद्दल विचार करताना आपणास मानसशास्त्रीय प्रतिमेपासून आजच्या काव्यांतर्गत प्रतिमेपर्यंत सर्वांचा विचार करावा लागतो. ज्ञानेश्वरीतील निसर्गप्रतिमा अभ्यासण्यापूर्वी या प्रतिमेचे नेमके स्वरुप काय ? तिच्या वेगवेगळ्या व्याख्या, तिचे काव्यांतर्गत महत्व, आवश्यकता या गोष्टींचाही विचार करणे आवश्यक ठरते. किंबहुना या विचाराखेरीज आपणास पुढे जाताच येत नाही.

प्रतिमेसंबंधी मराठी काव्यात जितका विचार झाला त्याहीपेक्षा अधिक व सखोल विचार पाश्चात्यांनी केला. प्रतिमेच्या विविध पातळ्या कल्पून वैज्ञानिकांपासून कलावंतांपर्यंत सर्वांनीच त्यावर बराच उहापोह केला. आपापल्या दृष्टिकोनातून प्रतिमेची वेगवेगळी रूपे स्पष्ट केली. त्यातील उपलब्ध माहितीच्या आधारे आपणही प्रतिमेसंबंधी विचार करणार आहोत.

## प्रतिमेची संकल्पना व विविध व्याख्या -

तत्वज्ञ किंवा वैज्ञानिक विविध प्रयोगांच्या आधारे नवनव्या संकल्पना मांडीत असतात. विविध प्रयोग करून नवे सिध्दांत प्रतिपादित असतात. तसे कलावंतदेखिल आपल्या काव्यात प्रतिमांची साधना करुन नवनव्या कलाकृती निर्माण करीत असतात. वैज्ञानिक संकल्पनांच्या भाषेत बोलतो तर कवी, प्रतिभावंत प्रतिमांच्या भाषेत बोलत असतो. यातूनच प्रतिमेची संकल्पना आली. प्राचीन

काळापासून काव्यात प्रतिमांचा वापर सतत होत आलेला आहे. कवीच्या अंत:करणातील उत्कट भावनाविष्कार प्रतिमांच्या रुपातून काव्यात येत असतो. काव्याचे मूलभूत जीवनतत्त्व या नात्याने प्रतिमांकडे पाहिले जाते. प्रतिमा कवीच्या मनातील निराकार भावनांना साकारत्त्व देतात. " तेणे कारणे मी बोलैन । बोली अरूपाचे रूप दाविन । अतीन्द्रिय परि भोगवीन । इंद्रिया करवी ।। "[१] ही वाणी सत्य करून दाखवतात. म्हणूनच काव्यात प्रतिमेचे स्थान अढळ व अपरिहार्य झाले आहे. मानवाने आपल्या स्वैर कल्पकतेच्या बळावर काव्याच्या विशाल गगनात उत्तुंग भरारी मारली त्याच क्षणी प्रतिमेच्या संकल्पनेचा जन्म झाला. आपल्या अंत:करणातले हळुवार विचार शब्दबध्द करण्यासाठी त्याला हे काव्यमय स्वरमार्दवाने निथळणारे भावरम्य असे प्रतिमा विश्व निर्माण करावेसे वाटले. व्यवहारात वापरून गुळगुळीत झालेल्या रूक्ष शब्दांच्या भोवती अक्करमाशी प्रमाणे घोटाळत बसण्यापेक्षा निरनिराळ्या नितांत सुंदर प्रतिमा व रुपकांचा वापर करणे त्याच्या नवनवोन्मेषशालिनी प्रतिभेस रुचले. त्यातूनच प्रतिमेच्या संकल्पनेचा उदय झाला.

प्रतिमेसाठी *Image* प्रतिमा, प्रतिमाच्छाया, कल्पनाचित्र, अनुभव-चित्र, उपमान, प्रतिमान असे विविध पर्यायी शब्द वापरले गेले.

डॉ. मा. गो. देशमुखांनी प्रतिमेला *Image* म्हटले व हे समिकरण बदलू नये असाहि आग्रह धरला. समिक्षेत गंभीर वाङ्मयासाठी *Ideology* [विचारविज्ञान] व ललित वाङ्मयासाठी *Imagery* हे शब्द वापरावेत असेही त्यांनी प्रतिपादिले.[२]

पं. महादेवशास्त्री जोशी यांनी आपल्या विवेचनात प्रतिमा म्हणजे प्रतिबिंब, नक्कल किंवा मूर्ती असे सांगून प्रतिमेचा अर्थच मूळ व्यक्तिचे सादृश्य

---

१. साखरेकृत "ज्ञानेश्वरी" - सारथी प्रकाशन, पुणे. संपा. दत्तराज देशपांडे अ. ६. ओवी ३६.

२. डॉ. मा. गो. देशमुख - "भावगंध" - पान २२.

दाखवणारी प्रतिकृती असा होतो असे म्हटले आहे.[१]

पु. ग. सहस्त्रबुध्देंनी प्रतिमेचा अर्थ प्रतिनिधी किंवा नमुना असा सांगितला आहे.[२]

रा. अ. काळे प्रतिमेला एक त-हेचे रुपकच मानतात.[३]

श्री. आपटे यांनी आपल्या संस्कृत कोशात प्रतिमा म्हणजे साम्य व्यक्त करणारी मूर्ती किंवा साधर्म्य व्यक्त करणारी वस्तू असे म्हटले आहे.

श्री. मर्ढेकर प्रतिमेसाठी प्रतिमाच्छाया ही संज्ञा सुचवितात व काव्य-जन्य संवेदना या प्रत्यक्ष संवेदना नसून केवळ प्रतिमाछाया असतात असे म्हणतात.

देशमुख[४] व वाळिंबे[५] यांनी प्रतिमांना कल्पनाचित्र, उपमान व प्रतिमान असेही शब्द सांगितले आहेत.

प्रतिमेस असणा-या या विविध प्रतिशब्दांचा विचार करता एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते. ती म्हणजे या सर्वच संज्ञा उचित ठरतात असे नाही. प्रतिमा म्हणजे रुपक व उपमा असे म्हटले तरी उपमा व रुपक यांची विशिष्ट मर्यादा पडते. फारतर प्रतिमा निर्माण करण्याची ही दोन साधने म्हणता येतील. शब्दातुन निर्माण होणा-या पंचविध प्रतिमा [शब्द, रस, स्पर्श, रुप, गंध] काव्याची सूक्ष्म उपकरणे असतात. संवेदनाचे केंद्रिकरण प्रतिमांच्या द्वारे मनावरच होते. सर्व ललित कलांप्रमाणे काव्यसंवेदनादेखिल अनुभवरुप असते. त्यामुळे काव्य-जन्य संवेदना प्रतिमाच्छाया ठरत नाहीत. हीच गोष्ट कल्पनाचित्र व अनुभवचित्र

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१. पं. महादेवशास्त्री जोशी - "संस्कृतीची प्रतिके" प्रस्तावना पान १
२. पु. ग. सहस्त्रबुध्दे - "स्वभावलेखन" - पान ३२
३. रा. अ. काळे - "नवकवितेचे एक तप" - कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे - पान ६
४. मा. गो. देशमुख - "भावगंध" - पान १२५, १२६.
५. डॉ. रा. शं. वाळिंबे - "ज्ञानेश्वरीतील विदग्ध रसवृत्ती" - प्रकरण १३ व १५.

या शब्दांचीही होते. चित्र हा शब्द प्रामुख्याने दृक्संवेदनेशीच निगडित आहे. काव्यात इतर संवेदनांपासून मिळणाऱ्या प्रतिमाही असतात. स्वत: ज्ञानेशांनीच पंचसंवेदनांना तृप्त करणारी कविता निर्माण करण्याची प्रतिज्ञा केली आहे.[१] प्रतिमान शब्द मात्र काहीसा समर्पक ठरतो. पंचेंद्रियासहित मनाला प्रतियमान होते ते प्रतिमान. प्रति म्हणजे प्रत, इ म्हणजे जाणे. जी मनाला जाऊन भिडते ती प्रतित्री व प्रतित्रीचे मान म्हणजे मूल्यमापन करते ते प्रतिमान. कवीची प्रतित्री प्रतिमानाद्वारा रसिकांना प्रतित्र होते व त्याआधारे रसिककविच्या काव्यशक्तीचे मूल्यमापन करतो. प्रतिमेच्या संज्ञा व पर्यायी शब्दांचा उहापोह केल्यानंतर "प्रतिमा" नेमके कशास म्हणावयाचे हे पाहणे गरजेचे ठरते.

## प्रतिमा म्हणजे काय ? -

प्रामुख्याने प्रतिमांचा विचार केला तो अलंकार म्हणून. पाश्चयात्य राष्ट्रांमध्ये सोळा, सतरा व अठराव्या शतकातील विचारवंतानी प्रतिमा म्हणजे "अलंकार" असे मानले. त्यांना काव्याचा गाभा मानले. कविता म्हणजे विविध प्रतिमांतुन निर्माण झालेले एक संयुक्त प्रतिमान आहे असाही विचार सौंदर्यवादयांनी मांडला.[२]

संस्कृत व मराठी साहित्यशास्त्रकारांनी प्रतिमा निर्मितीचे साधन म्हणून अलंकारांचा सखोल विचार केला. भरतमुनी, जगन्नाथ पंडित, दंडी, आनंदवर्धन, व मम्मट इ.नी अलंकारांचा संबंध काव्याच्या अंतरंगाशी जोडला.

---

१. ज्ञानेश्वर - "सार्थ ज्ञानेश्वरी" - प्र. ६ - ओव्या १६ ते २०.

२. मालती पाटील - तुकारामांची प्रतिमासृष्टी व त्यांच्या काव्यात्मशक्तीचे मूल्यमापन - नागपूर विद्यापीठ प्रकाशन, १९७८, प्रकरण २ - पान २१.

रा. श्री. जोग, प्रा. धोंड इ. प्रभृतींनी अलंकारांना स्त्रीचे विभ्रम, कवचकुंडले या उपमा दिल्या. अलंकार म्हणजे भात्याने फुंकलेला वारा नसून कवीचे नि:श्वसित आहे असे काळेले यांनी प्रतिपादिले.[१] येथे अलंकार म्हणजे प्रतिमा असे गृहितच धरले गेलेले दिसते.

मात्र प्रतिमा कधी दृश्य असते, कधी एखादया संवेदनेची अनुकृती म्हणून येते. कधी केवळ एक विचार म्हणून, एक अलंकार म्हणून वा कोणत्याहि दोन वस्तूतील तुलनात्मक एकात्मता म्हणून येउ शकते. त्यामुळे केवळ उपमा व रूपक म्हणजे प्रतिमा असे म्हणणे संयुक्तिक ठरत नाही.

प्रतिमेची व्यापकता बरीच मोठी आहे. मानसशास्त्रीय व साहित्य-शास्त्रीय पातळीवरून तीचा दुहेरी विचार केला जातो. मानसशास्त्रात मानसिक पुनर्निर्मिती भूतकालीन संवेदनेची अगर इंद्रियगोचर अनुभुतीची स्मृती असा केला आहे. सी. डब्ल्यू. ब्रे. प्रतिमेची व्याख्या "मूळ उद्दिपक अनुपस्थित असतांना पूर्णपणे किंवा अंशिक रूपाने पूर्वानुभुत वस्तुबोधनाला पुनर्निर्मित करणा-या जाणीव-पूर्ण स्मृती" अशी करतो. त्याने अनुभव व स्मृतींवर जोर दिलेला दिसतो. यात कल्पनेला कुठेच वाव दिलेला नाही.

हिंदी साहित्यकोशात "ताल, लय, गती, विन्यास, संतुलन इत्यादी अंगांसह ज्यात सुंदरता अविर्भूत होते असा कलाकाराचा सौंदर्यानुभुतीतील मानस प्रत्यक्ष म्हणजे प्रतिमा"[२] असे सांगितले आहे. तथापि मानसप्रत्यक्ष या शब्दाच्या संदिग्धतेमुळे ही व्याख्याही अपूर्ण वाटते.

---

१. रा. अ. काळेले - "नवे अलंकार" - पान १७

२. डॉ. धीरेंद्र वर्मादि संपादक मंडळ - "हिंदी साहित्यकोश" - पान ४७७.

"शब्दांनी रेखाटलेले चित्र" अशीही प्रतिमेची व्याख्या केली जाते. सी. डी. लेविस[१], जे. आर. टर्नबुल[२] यांनी या व्याख्येवर भर दिला आहे. तथापि ही व्याख्या अव्याप्त वाटते. कारण प्रतिमा इतर संवेदनांपासूनही मिळतात. "चित्र" शब्द केवळ हक् संवेदनेशीच संबंधित आहे.

संवेदना हा प्रतिमांचा महत्त्वपूर्ण गुण आहे. रुप, रस, गंध, स्पर्श व श्रवण या पाचही संवेदनापासून प्रतिमा मिळतात. अशा "संवेदना गुणांनी युक्त असलेले शब्दचित्र वा संवेदनेचा साक्षात्कार म्हणजे प्रतिमा होय." तथापि या व्याख्येत एकांगीपणा दिसतो. केवळ संवेदनात्मक शब्दचित्र म्हणजे काव्यगत प्रतिमा ठरत नाही. त्यात कवीचा भावसंवेग व वासना अंतर्भूत होत नाहीत. म्हणून "अनिवार्य स्वरूपात संवेदनागुणांनी युक्त असलेले, कवीचा भावसंवेग व वासना यांनी संपृक्त असलेले शब्दचित्र म्हणजे काव्यगत प्रतिमा" अशी सर्वसमावेशक व्याख्या केली जाते. या संदर्भात कोलरिन म्हणतोच की "प्रतिमा कितीही सुंदर असो ती शक्तीशाली वासनेशी संयुक्त झाल्याशिवाय कवीचे वैशिष्टय प्रकट करु शकत नाही.

या सर्व गोष्टी लक्षात घेऊन सी. डी. लेविस प्रतिमेची व्याख्या करताना म्हणतो - "कमी अधिक प्रमाणात संवेदनागुणांनी युक्त असणारे, काही विशिष्ट मर्यादेपर्यंत रुपकात्मक असणारे, स्वसंदर्भात एक प्रकारचा मानवी भावनावेग अंतर्भुत असणारे, तसेच एका वैशिष्टयपूर्ण काव्यात्मक भावनेने, वासनेने युक्त असून ती काव्यात्मक भावना व वासना वाचकांमध्ये संपादित करणारे चित्र म्हणजे प्रतिमा".

---

१. सी. डी. लेविस - *'Poetic image is a picture made out of wards'*

२. जे. आर. टर्नबुल - *' Poetry is the word painting'.*

तथापि ही व्याख्याही परिपूर्ण नाही. उत्कृष्ट प्रतिमा कवीचा आशय रसिकात संक्रमित करते. वाचकांच्या मन:स्थितीनुसार व व्यक्तिपरत्वे कलाकृतींचा विभिन्न परीणाम होतो. मात्र कलाकृतींमुळे होणारा आनंद सर्वांनाच होत असतो. हा आनंद का होतो ? हा महत्वाचा मुद्दा आहे. याचा उल्लेख या व्याख्येत नाही. त्यामुळे ही व्याख्या अपूर्ण ठरते.

काही अभ्यासकांनी प्रतिमेला मानसशास्त्राचा व वाङ्मयाभ्यासाचा विषय मानून त्या धर्तीवर प्रतिमेच्या व्याख्या केल्या. "प्रतिमा म्हणजे भूतकालीन, संवेदनात्मक वा ऐंद्रिय अनुभवाची पुनर्निर्मिती, स्मरण होय. त्यांनी अचल व गतिमान असे प्रतिमांचे दोन भेद सुध्दा सांगितले व ती एक मानसिक घटना असल्याने तीची गुणकारीता वाढते. ती संवेदनेचा अवशिष्ट भाग व प्रातिनिधीत्व नसून कालोघाच्या क्षणातील बौध्दिक व भावनिक व्यामिश्रतेचे प्रदर्शन करणारी बाब आहे. ती अतुलनीय कल्पनांचा संयोग आहे. असे सांगतो.[१] तर मिडलटन मुरे उपमा व रुपकांचा अलंकारशास्त्राच्या वर्गीकरणाशी संबंध जोडून प्रतिमेचा उल्लेख या दोन्ही संज्ञा समाविष्ट होतील असा करावा असे प्रतिपादन करतो.[२]

जेम्स लिऊ या चिनी भाषा समिक्षकाने "प्रतिमा म्हणजे कुठल्याही अन्य वस्तुचा निर्देश न करता मानसिक चित्र निर्माण करणारी वा मनात एखादी इंद्रिय संवेदना जागृत करणारी शाब्दीक अभिव्यक्ती म्हणजे प्रतिमा" अशी सरळसोट व्याख्या करुन "साधी प्रतिमा" व "संयुक्त प्रतिमा" असे भेद केले. त्याने एक अनुभव दुस-यात रुपांतरीत करण्याच्या शाब्दीक अभिव्यक्तीला संयुक्त प्रतिमा [ Compound Image ] व मानसिक प्रतिमांची जागृती करणा-या प्रतिमांना साधी प्रतिमा म्हटले. उपमा, रुपकांचा अंतर्भाव त्याने प्रतिमेत केला. रिचर्ड प्रतिमेला वाचकांच्या मन:पटलावर उमटणारे चित्र असे

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१ व २ पु. दि. धर्माधिकारी -"वाङ्मयसिध्दांत" - अजब पुस्तकालय, कोल्हापूर पान १७५, १७६.

म्हणतो. प्रभाकर पाध्ये प्रतिमेला "संवेदनाचित्र" असे म्हणतात. प्रतिमेच्या विविध व्याख्यांचा विचार करून डॉ. सुधीर रसाळ यांनी एक स्थूल व्याख्या केली आहे. यात ते उच्चारांनी चिन्हांकित होणा-या दोन वा अधिक मानसिक संदर्भामध्ये - म्हणजेच त्यातील संवेदना कृती व तत्संलग्न भावनिक, वैचारिक घटक यात घडणा-या साधर्म्य वैधर्म्याधिष्ठित आंतरप्रक्रियेतून निर्माण होणारी मूर्त, गतीशील, अनेकार्थी व सेंद्रिय संघटना म्हणजे प्रतिमा असे म्हणतात.[१]

आतापर्यंत पाहिलेल्या सर्वच व्याख्यांचा चिकित्सक अभ्यास केल्यास प्रत्येक व्याख्या कोठे ना कोठे अपुरी वाटते. कोणी चित्रात्मकतेला महत्व देते तर कोणी संवेदयतेला महत्व देते. कोणी तिचे दृश्य स्वरुप पाहते तर कोणी तिच्यातील साधर्म्य वैधर्म्यावर अधिक भर देते. परिणामी कोणतीच व्याख्या सर्वसमावेशक व व्यापक ठरत नाही. अर्थात आपणास या व्याख्यांच्या मुळाशी जाण्याइतपत सखोल अभ्यास करावयाचा नाही. तो अपेक्षितही नाही. तरीही प्रतिमेद्वारा होणारा काव्यसत्याचा अविष्कार त्याद्वारे वाचकास मिळणारा आनंद, त्यांचे परस्परावलंबित्व, संदर्भगत सापेक्षता ही सर्व वैशिष्टये लक्षात घेऊन आपणास प्रतिमेची सर्वसमावेशक अशी अचूक व्याख्या पुढीलप्रमाणे करता येईल.

"संवेदयता, रुपकात्मकता, उत्कट भावना व वैशिष्टयपूर्ण काव्यात्मक वासना यांनी ओथंबलेले आणि कवीची अनुभुती वाचकांमध्ये संक्रमित करीत असताना संदर्भगत सापेक्षता व परस्परावलंबन यातून निर्माण होणा-या काव्यात्मक सत्याद्वारे रसिकांच्या चित्रवृत्ती आनंदित करणारे शब्दचित्र म्हणजे प्रतिमा होय."

प्रतिमेच्या विविध व्याख्या आपण अभ्यासल्या. त्यातून प्रतिमा म्हणजे काय याचे नेमके स्वरुप समजून घेण्याचाही प्रयत्न केला. कुणी प्रतिमेची संवेदयता

---

१. डॉ. सुधीर रसाळ - "कविता आणि प्रतिमा" - मौज प्रकाशन, मुंबई १९८२ - प्रकरण ३ - प्रतिमेचे स्वरुप - पा. २३२.

महत्त्वाची मानली तर कोणी चित्रात्मकतेला प्राधान्य देऊन प्रतिमा म्हणजे स्वसंवेदय शब्दचित्र असे आग्रहाने प्रतिपादिले. कोणी प्रतिमेतील काव्यात्म सत्याच्या अविष्कारावर व त्यातून मिळणा-या आनंदावर लक्ष केंद्रित केले. कधी त्याला स्मृतीचे स्वरूप दिले तर कधी प्रतिमेचा संबंध अलंकाराशी जोडून उपमा रूपकादि अलंकाराचा प्रतिमेशी संबंध जोडला. कित्येकदा प्रतिमा म्हणजे व्यंजना असेही सांगण्याचा प्रयत्न केला. या सर्वच व्याख्या पूर्णत: चुकीच्या आहेत वा अपूर्ण आहेत असे म्हणता येत नाही. [सप्तभंगीनय] सात आंधळयांच्या दृष्टांताप्रमाणे या व्याख्यांची अवस्था झाली एवढेच. प्रत्येकाने प्रतिमेचे एकच अंग पाहिले व त्यावरून संपूर्ण प्रतिमेची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला. तथापि त्यांना हे समजले नाही की आपणास जे समजले ते प्रतिमेचे केवळ एक अंग आहे. या सर्व अंगांची मिळून प्रतिमा तयार होते. प्रतिमेच्या या छोटयाछोटया घटकांनाच प्रतिमा मानुन प्रत्येकाने आपापल्या मताचा अट्टाहास धरला. सात आंधळयांना जाणवलेल्या सात गोष्टींचे संकलित रुप म्हणजे प्रतिमा होय असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. या प्रत्येकाने मांडलेल्या, त्यांना जाणवलेल्या वैशिष्टयांचा समावेश करुन त्यातून जी योग्य व समर्पक व्याख्या केली जाईल ती अधिक अचूक व निर्विवाद ठरेल हे नि:संशय म्हणूनच सर्वात शेवटी घेतलेली व्याख्या यादृष्टिने महत्त्वाची ठरते. त्यात प्रतिमेच्या सर्वच अंगांचा विचार केलेला आहे. तिची संवेदयता, रूपकात्मकता याचबरोबर तिच्यातील उत्कट भावना व काव्यात्मक वासना याचाही यात विचार केलेला आहे. कवीच्या अनुभूतीचे संक्रमण वाचकात होत असतानाची संदर्भगत सापेक्षता, प्रतिमांचे परस्परावलंबित्व, रसिकाला त्यातून मिळणारा आनंद व काव्यातून अविष्कृत होणारे सत्य या सर्वच गोष्टी यात समाविष्ट असल्याने ही व्याख्या अधिक संयुक्तिक वाटते. ब-याचदा प्रतिमेच्या बाबतीत काही संदिग्ध विधाने केली जातात. तिचे अनेक अर्थ लावले जातात त्यामुळे तिचे नेमकेपण स्पष्ट होऊ शकत नाही. तरीही या संदिग्धतेतुन मध्यम मार्ग काढण्यासाठी वरील व्याख्या पुरेशी ठरते.

## प्रतिमेचे काव्यातील महत्व -

प्रतिमा हे काव्याचे अविभाज्य अंग आहे. काव्य म्हटले की प्रतिमा आलीच. कोणत्याही काव्यात प्रतिमा अटळ असते. किंबहुना प्रतिमेशिवाय काव्य म्हणजे प्राणाशिवाय शरीर असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. काव्याप्रमाणे प्रतिमांचा उपयोग शास्त्रातही होतो. परंतु शास्त्राचा प्रतिमेकडे पाहण्याचा दृष्टिकोन एक ज्ञानदानाचे साधन एवढाच असतो. *Yeats* म्हणतो - "जगातील ज्ञानसुध्दा प्रथम प्रतिमांच्याच भाषेत बोलू लागले. [ *Wisdom speaks first in images* ][1]. शास्त्रे प्रतिमांचा उपयोग विषयांच्या स्पष्टीकरणासाठी करतात. परंतु शास्त्रात प्रतिमा असल्याच पाहिजेत असा आग्रह नसतो. शास्त्रज्ञाच्या अभिव्यक्ती क्षमतेवर प्रतिमा वापरावयाची की नाही ते ठरत असते. काव्यात मात्र नेमके याच्या उलट असते. काव्यात प्रतिमा ही श्वासोच्छ्वासाइतकी महत्वाची असते. प्रतिमेच्या आधाराशिवाय कवी काव्य लिहू शकत नाही. डॉ. वाळिंबे आपल्या "ज्ञानेश्वरीतील विदग्ध रसवृत्ती"मध्ये प्रस्तावनेत स्पष्टच म्हणतात की, "ज्ञानेश्वरांसारखा मिस्टिक कवी जे बोलेल ते नेहमी उपमानांच्या, प्रतिमानांच्या, रुपकांच्या, प्रतिकाच्या भाषेतच बोलेल. तो त्याचा स्वभाव धर्मच असतो".

पंचविषयात्मक सूक्ष्म प्रतिमासृष्टी हेच काव्याचे प्रमुख उपकरण नसते. कोणताहि कवी प्रतिमांच्याच भाषेत बोलत असतो. किंबहुना आपल्या आशयाची उत्कट व प्रभावी अभिव्यक्ती करण्यासाठी त्याला प्रतिमा आवश्यकच असतात. अर्थात उत्तम प्रतीच्या काव्यात प्रतिमा असतातच पण भरपूर प्रतिमा असणारे काव्य नेहमी उत्कृष्ठ ठरते असे नाही हेही लक्षात घेतले पाहिजे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१. मालती पाटील - तुकारामाची प्रतिमासृष्टी व त्यांच्या काव्यात्मशक्तीचे मूल्यमापन - नागपूर विद्यापीठ प्रकाशन - १९७८ - प्रकरण २ - पान ८.

प्रतिमा महत्वाची ठरण्याचे दुसरे महत्वाचे कारण म्हणजे प्रतिमा काव्याचे व्यवच्छेदक लक्षण आहे. प्रतिमेशिवाय प्रतिभावंत व प्रतिभावंताशिवाय सुंदर काव्य निर्माण होणे अशक्य असते. कवीने प्रतिमांचा उपयोग सोडून दिला तर शास्त्राची नीरस भाषा व काव्याची रसाळ वाणी यात फरक रहाणार नाही. आपल्या माधुर्यपूर्ण वाणीने रसिकांवर काव्यरस बरसणारी कवीची मधुवंती आपले माधुर्य, गेयता विसरून एखादया धीरगंभीर शास्त्रज्ञासारखे शब्द मोजून मापून सिध्दांत सांगू लागेल. कल्पनेच्या उत्तुंग भरा-या मारून रसिकाच्या मन:पटलावर एकाहून एक अशी सरस भावचित्रे रेखाटण्याचे काम प्रतिमा करीत असते. किंबहुना काव्याचे वेगळेपण प्रतिमेमुळेच सिध्द होते. म्हणूनच प्रतिमा हे काव्याचे व्यवच्छेदक लक्षण आहे असे म्हटले जाते. कथा, कादंब-या, नाटके यात प्रतिमा नसतात असे नाही. पण तिचे खास क्षेत्र म्हणून काव्याकडेच बोट दाखवले जाते. इतर साहित्य प्रकारापेक्षा काव्यात प्रतिमेला अधिक वाव असतो.

प्रतिमा व काव्याची एकरूपता सांगताना रा.श्री.जोग म्हणतात, "प्रतिमेशिवाय काव्य होऊच शकत नाही. जसे अनलंकृत शब्द हे काव्यात क्वचित असू शकतात, असे मम्मटाने सांगितले".[१] प्रतिमा व काव्याची समरसता सांगतांना काही अभ्यासक त्यांना प्रेमळ पतीपत्नीच्या जीवनातील एकरूपतेची उपमा देतात. एवढा या दोहोत अभेद असतो. या दोन्ही संज्ञा एकच अर्थ दर्शवितात. या दृष्टीने प्रतिमा व काव्यातील अभिन्नता, तद्रूपता फार महत्वाची ठरते.

प्रतिमेमुळे काव्यात दिव्य सौंदर्याची अनोखी सृष्टी फुलू लागते. नवचैतन्य स्फुरू लागते. महत्प्रयासानेदेखिल शब्दांच्या चिमटीतून वारंवार निसटणा-या सूक्ष्म, तरल भावसंवेदनादेखिल प्रतिमेत आपण होऊन बंदिस्त

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१. रा.श्री.जोग - "चर्वणा" - मुख्यार्थाची कैफियत - पान १०२.

होतात. मानवी मनातील अनाकलनीय व गूढ विचारतरंग प्रतिमांच्या रुपात रसिकांसमोर साकार होतात. इतकेच नव्हे तर अज्ञानाच्या क्षितिजाशी अभिव्यक्तीचा मार्ग न मिळाल्याने हिरमुसली होऊन अतीव नैराश्याने कपाळमोक्ष करून घ्यायला उद्युक्त झालेली कल्पनाही प्रतिमारुपाने मूर्तिमंत स्वरुपात रसिकांसमोर हात जोडून उभी राहते. म्हणूनच प्रतिमा हे काव्याचे जीवन, काव्याचे स्वयंभू, स्वयंनिर्मित, प्राणभूत आत्मतत्व ठरते. हे महत्व लक्षात घेऊनच पाश्चात्य व पौर्वात्य अभ्यासकांनी काव्यमिमांसेत प्रतिमानाला सर्वश्रेष्ठ स्थान दिले आहे. प्रतिमासृष्टीच्या उंचीवरच काव्याची उंची, श्रेष्ठकनिष्ठता अवलंबून असते. आपल्या प्रतिमानिर्मितीच्या विशेष क्षमतेमुळेच कवी जीवनातील व वाङ्मयातील अनेक गूढ तत्वे व रहस्ये उकलून दाखवणारा महान भाष्यकार ठरतो हे देशमुखांचे म्हणणे पटण्यासारखे आहे.[१] ब-याचदा समीक्षक कवीच्या काव्याचे मूल्यमापन त्याच्या प्रतिमासृष्टीच्या प्रभावीपणा व नाविन्यावर आधारून करतात.

युंग सारखा एखादा अभ्यासक प्रतिमांना मानसशास्त्रीय बैठक देऊन या "प्रतिमा म्हणजे मानवाने अस्तित्वकलहात व या जगाशी मिळते जुळते घेण्याच्या धडपडीत हजारो वर्षे जे अनुभव घेतले त्याचे निक्षेप होत" असे म्हणतो. प्रतिमांमुळे कलावंताचा मानस साक्षात्कार रसिकाला त्याच स्वरुपात प्रतित होण्यास मदत होते. प्रतिमेमुळे काव्यगत आशयाला जिवंतपणा येऊन तो अधिक स्पष्ट होण्यास बरीच मदत होते. तसेच भाषेत काटेकोरपणा सुध्दा येतो. अर्थात याचा अर्थ असा नव्हे की केवळ प्रतिमांची उतरंड रचून वा पखरण करून काव्याला सौंदर्य प्राप्त होते. प्रतिमांमुळे सौंदर्य वाढते. परंतु प्रतिमा औचित्यामुळे आशय घनता, स्पष्टता, विवक्षितपणा व कोरीवपणा येतो. नेमकेपणाही येतो. प्रतिमा हे काव्यसौंदर्याचे एक साधन आहे साध्य नव्हे हे विसरून चालणार नाही.

---

१. डॉ. मा. गो. देशमुख – "भावगंध" – पान १२६.

आदिमानवाच्या प्राथमिक कवितेत प्रतिमा निर्मिती झाली ती निसर्गाचे ज्ञान करून घेण्याच्या आवश्यकतेतूनच. मानव व निसर्गाचा अन्योन्य संबंध असल्याने त्याच्या दृष्टिने प्रतिमा हे निसर्गातील वस्तूंचे ज्ञान करून घेण्याचे महत्वाचे साधन असते. प्रतिमेचे काव्यातील महत्व लक्षात घेता काव्य व प्रतिमांचा परस्पर संबंध किती अतूट, अभंग आहे याची पूर्णत: कल्पना येते. प्रतिमेचे महत्व पाहतानाच काव्य व प्रतिमा यांच्या इतकाच कवी व प्रतिमा यांच्यातील संबंध देखिल पहाणे गरजेचे ठरते.

## कवी व प्रतिमा -

ब-याचदा प्रतिमेचे मूल्यमापन करताना त्याचा संबंध कवीच्या व्यक्तीमत्ताशी जोडला जातो. कवीचे व्यक्तिमत्व जेवढे व्यापक तेवढेच त्याचे काव्य व्यापक ठरते. किंबहुना स्वत:च्या व्यक्तिमत्वापेक्षा महान काव्य कवीला निर्माणच करतो येत नाही. त्याचे कल्पनाविश्व जेवढे अमर्याद व समृध्द तेवढी त्याची प्रतिमासृष्टी विशाल, व्यापक व महान ठरते. व प्रतिमासृष्टीच्या व्यापकतेवरच त्याच्या काव्याची उंची व श्रेष्ठत्व अवलंबून असते. कवीचे व्यक्तित्व श्रेष्ठ तितका त्याच्या कल्पनेचा आवाका मोठा व कल्पकतेचा आवाका मोठा तितकी त्याची प्रतिमासृष्टी वैविध्याने नटलेली. प्रत्येक कवी आपल्याच कल्पनाविश्वात रममाण असतो. क्लप म्हणजे निर्माण करणे व ही निर्माणशक्ती म्हणजे कल्पनाशक्ती [*imagination* ] या कल्पनाशक्तीद्वारा तो अनेक अज्ञात वस्तूंना साकाररूप देत असतो. वायवीय शून्यतेला तो नावारूपास आणतो. हे कार्य सौंदर्य कल्पनेतून निर्माण होणा-या प्रतिमाच करत असतात. या प्रतिमांची निर्मिती करणारी मानसप्रक्रिया म्हणजेच कल्पनाशक्ती असते. या कल्पनाशक्तीच्या बळावर तो नवनवी प्रतिमासृष्टी निर्माण करीत असतो.

अर्थात कवी केवळ भूतकालीन अनुभूतीद्वारे प्रतिमा निर्माण करून थांबत नाही तर कल्पकतेच्या सहाय्याने भविष्याची मधुर स्वप्नेही प्रतिमारुपानं

साकारीत असतो. कधी तो हेतूपर्वक कल्पना निर्मिती करत असतो तर कधी उत्स्फूर्तपणे त्याला प्रतिमा सुचत जातात. जेव्हा एखादा कवी एखादी विशिष्ट घटना, दृश्य वा विषयावर काव्य लिहण्याचा निश्चय करुन लेखनास प्रवृत्त होतो त्यावेळी आपल्या विचारांच्या सुयोग्य मांडणीसाठी कोणकोणत्या प्रतिमा उपयुक्त ठरतील याचा तो शोध घेतो. क्वचित समर्पक अशी एखादी नवी प्रतिमाही घडवतो. त्यातील निवडक सुयोग्य प्रतिमानांचा उपयोग करुन तो काव्यनिर्मिती करतो. संत व पंत कवितेच्याकडे पाहिल्यास त्यातील काही भाग या पध्दतीने निर्माण झालेला दिसतो. संत कवींनी तर परमेश्वर व परमार्थ याच विषयांवर काव्यलेखन करावयाचे ठरवल्याने ते विषय मांडताना एका ठराविक चाकोरीचाच अवलंब करताना दिसतात. काही विशिष्ट प्रतिमांची पुनरावृत्ती सर्व संतकवींच्या अभंगात थोडयाबहुत फरकाने झालेली दिसते. उदाहरण - भक्त व देवाचे नाते सांगताना प्रियकर-प्रेयसी, आई-बाळ, गाय-वासरु या प्रतिमा तसेच अमृत, कामधेनु, कल्पतरु, चिंतामणी या प्रतिमा पुन:पुन्हा येतात. तथापि कवितेतील प्रतिमेबरोबर कवीच्या व्यक्तिमत्वाचे विशेषही अपरिहार्यपणे जाणवतात. ब-याचदा त्या त्या प्रतिमांवर त्या कवीच्या व्यक्तिमत्वाची स्पष्ट छापही उमटलेली दिसते.

प्रतिमांच्या नाविन्यावर काव्याचे महत्त्व ठरतेच. त्याहिपेक्षा प्रतिमेमध्ये प्रस्थापित होणारे भावनिक नाते, त्यातील रचनाबंध शब्दबंध कवीने कसा केला आहे हे महत्वाचे असते. या पदान्वयातून जेव्हा कवी एक अनोखे प्रतिमांकित रूप साकार करतो व त्याची रसिकांना जाणीव होते तेव्हाच कवी व रसिक यांच्यात खराच सुसंवाद साधला जातो. कवी जेव्हा आपल्या प्रतिमासृष्टीत रममाण असतो तेव्हा त्याच्यावर लज्जेचे वा विवेकाचे कसलेच नियंत्रण नसते. त्याच्या प्रतिमा पूर्णत: मुक्त असतात, स्वतंत्र असतात. त्याची प्रतिमासृष्टी म्हणजे त्याच्या अबोध मनोविश्वाची केंद्रवर्ती देणगी असते व म्हणून या प्रतिमासृष्टीद्वारे कवी बोलतो ते कलावंत या नात्याने नसून एक माणूस म्हणून बोलत असतो. त्याची प्रतिमासृष्टीही त्याच्या "स्व"ची अभिव्यक्ती असते. याचाच अर्थ कवी स्वत:च्या अंतरंगातील भावभावना तरल व

सूक्ष्म विचार कलये प्रतिमारूपात अविष्कृत करीत असतो. आपल्या कल्पकतेचे रंगीबेरंगी पंख लावून तो काव्यरुपी आकाशात प्रतिमांच्या मंद समिरण लहरी चित्रित करीत असतो. अंत:करणात झंकारणा-या भावसंगीताचा प्रगट अविष्कार करण्यासाठी त्याला प्रतिमारूपी सूरांची गरज भासली व यातूनच प्रतिमांचे सुस्वर जग शब्दरूपात साकार झाले.

"इंद्रिया लागे कळंमा [अ. ६-१४, २१] असे लेखन करण्याची सर्व इंद्रियांना श्रवण फुटतील असे काव्य लिहण्याची कवीची मनीषा असल्याने तो नेहमी प्रतिमांच्या भाषेतच बोलत असतो. कवी व प्रतिमा यांचा संबंध दृढ असतो. प्रतिमांची भाषा ही त्याची सहज प्रवृत्ती असते. साहजिकच कवी व प्रतिमा यांना परस्परांपासून वेगळे करता येणार नाही. "शशिनां च निशा, निशयां च शशी । शशिनां निशयां च विभाति नम: ।।" या उक्तीप्रमाणे प्रतिमेने कवी व कवीमुळे प्रतिमा शोभत असतात. दोघेही परस्परांची शोभा वाढवित असतात. मतितार्थ एवढाच की कवी व प्रतिमेचे नाते परस्परावलंबी असतेच पण दोघांनाही एकमेकांशिवाय स्वतंत्र अस्तित्व देता येत नाही. प्रतिमे-शिवाय कवी "कवी" ठरत नाही. कवी म्हणून त्याचे अस्तित्वच शिल्लक रहात नाही. कवीने प्रतिमासृष्टीचा त्याग केला तर तो प्रत्येक शब्द तोलून मोलून वापरणारा शास्त्रज्ञ किंवा सिध्दांतकार ठरेल. भावनेचे जसेच्या तसे वर्णन केल्याने सर्वसामान्य लोकांची भावना व त्याचे भावविश्व यात फरकच राहणार नाही. तो एक सामान्य माणूस ठरेल. "जे न देखे रवि, ते देखे कवी" ही किमया त्याला त्याच्या प्रतिमासृष्टीमुळेच शक्य होते. या प्रतिमासृष्टीचा त्याने त्याग केला तर त्याचे हे वेगळेपणच निघून जाईल. कवीशिवाय प्रतिमासृष्टीदेखिल शक्य नाही. प्रतिमासृष्टीतून कवीला वगळल्यास त्या प्रतिमा अर्थहीन, संदर्भहीन व व्यक्तीत्वहीन ठरतील, कारण प्रत्येक प्रतिमेला कवीच्या व्यक्तिमत्वाची पार्श्वभूमी लाभलेली असते. त्याच्या भावनांचा संदर्भ मिळालेला असतो. केवळ प्रतिमांचा गठ्ठा पुढे ठेवला तर तो निरर्थक ठरतो. कवी केवळ प्रतिमांची मालिका पुढे ठेवत नाही तर तिच्यात एक सुसूत्र सुसंगती आणि आशयघनता, अर्थपूर्णता आणित असतो. एखादया

प्रसंगाचा वा घटनेचा संदर्भ त्याच्या मागे जोडीत असतो. त्यामुळे प्रतिमा सार्थ ठरतात म्हणूनच कवी व प्रतिमा या दोघांनाही परस्परांची नितांत गरज आहे.

## प्रतिमा प्रक्रिया -

कला म्हणजे मानवी मनाचा प्रतिमा- प्रतिकात्मक अविष्कार असतो. प्रतिमा ही खास मानवी मनाची निर्मिती मानली जाते. म्हणून "प्रतिमा निर्मिती करणारा प्राणी" असे माणसाचे व्यवच्छेदक लक्षण मानले जाते. यातच कलानिर्मितीचा व्यापार समाविष्ट होतो. कलियुग याने मनाचे तीन स्तर कल्पिले आहेत. चेतन मन, वैयक्तिक निश्चेतन [*Personal Unconscious* ] व सामूहिक निश्चेतन मन. चेतन मन प्रतिमा-प्रतिकांची निर्मिती शेवटच्या दोन स्तरांच्या सहाय्याने करीत असते.

त्यांना आपण सहजप्रवृत्ती म्हणतो त्या शारीर प्रेरणा असतात व त्या ज्ञानेंद्रियांना जाणवतात. पण त्याचबरोबर त्या कल्पनाविश्वातही अविष्कृत होतात. आपली उपस्थिती प्रतिकात्मक रुपात प्रगट करतात. या अविष्काराला युंग "आदिबंध" म्हणतो. या बंधांची जाणीव कला सृष्टीत आवृत्त होणा-या विशिष्ट प्रतिमांवरुन होते. यालाच "आदिम प्रतिमा" म्हणतात. या प्रतिमांना चालना देऊन, विकसित करुन परिपूर्ण कृतीचे रुप देणे म्हणजे निर्मितीप्रक्रिया होय.

जेव्हा मानवी जीवन एकांगी बनते तेव्हा काही मनस्वी व्यक्ती अस्वस्थ होतात. आपली समग्रता संपादण्यासाठी व समाजाची समग्रता देण्यासाठी त्या धडपडतात. या प्रक्रियेत त्यांच्या मनात ताण निर्माण होतात. ते वैयक्तिक व सामुहिक निश्चेतनाचा भाग ढवळून काढतात. ते ताण घालवताना त्यांच्या मनाला काही नव्या प्रतिमा उपलब्ध होतात. चेतन पातळीवर जगताना वृध्द झालेल्या सहज प्रवृत्तीच्या अतार्किक स्वप्न-

व्यापारांनी पछाडलेल्या मानवाला कलाकृतीच्या रूपात तशीच एक स्वप्नप्रतिमा उपलब्ध करून देताच त्याला मंत्रशक्ती लाभल्याचा आनंद होतो. प्रतिमातून रसिकाला कलावंताचा मानस साक्षात्कार त्याच स्वरूपात प्रतीत होतो.

कलावंताच्या मनात केंद्रिय आशय, एकेक प्रतिमा व त्यांचे परस्पर परीणाम यांचे रसायन व्हावे लागते. प्रतिमा या कलाकृतीचे अंत:स्फूर्त अविष्कार असतात. प्रतिमा निर्माण होताना काही विशिष्ट प्रक्रियेने त्यांची निर्मिती होत असते.

[अ] कवी एखादा विषय ठरवून त्यावर काव्य लिहण्यास प्रवृत्त होतो. त्यासाठी उपयुक्त ठरणा-या प्रतिमा शोधतो व त्यांच्या आधारे काव्य निर्मिती करतो. मात्र यातील प्रतिमा विशिष्ट चाकोरीच स्वीकारताना दिसतात. संताच्या कवितेतील पति-पत्नी, प्रियकर-प्रेयसी, आई-बाप-बाळ, कामधेनु, कल्पतरू इ. प्रतिमा उदाहरणादाखल घेता येतील.

[ब] उत्स्फूर्तपणे केलेल्या काव्यलेखनातील प्रतिमा सहज व अकृत्रिम असतात. नामदेव व तुकारामांचे अभंग यात मोडतात. प्रथम काही भावच्छटा मनात तरळतात. लगेच त्या भावनांना समर्थ करणा-या प्रतिमा कल्पनेच्या वारूवर स्वार होऊन त्यांच्याकडे धाव घेतात व काव्य निर्माण होते.

[क] कित्येकदा भक्तीपोटी वा नम्रतेपोटी कवी आपल्या लेखनाचे श्रेय बाह्यशक्तीला देतात. "साळुंखी मंजुळ बोलतसे वाणी I बोलविता धनी वेगळाचि II" [२९५०] किंवा "माझिया बळाने नाही मी बोलत I बोलविता मज पांडुरंग II" या तुकारामांच्या ओळी हेच सुचवतात. अशा कवितेत प्रतिमा स्वाभाविकपणे व सहजतेने निर्माण होतात.

[ड] काही कवी कृत्रिमपणे शब्दांची ओढाताण करून कृत्रिम शब्द व प्रतिमांचे संशोधन करून कविता लिहतात. अशा लेखनात कलेपेक्षा कारागिरी व शाब्दिक कसरतच अधिक दिसते. प्रतिमासृष्टी प्रयत्ननिर्मित असल्याने त्यात निसर्गरम्य अव्याजमनोहर सहजता क्वचितच दिसते. केशवसुतांची "शब्दांनो

मागुते या" ही कविता याचे उदाहरण आहे.

[इ] कधी एखादी प्रतिमा सुचते. तिच्याशी संबंधित प्रतिमांची शृंखला निर्माण होते. त्यात सुसंगती साधुन कवी काव्य लिहतो.

[फ] काही कवी अर्ध्या रात्री उठून स्मरण झाल्याप्रमाणे एखादी कवीता लिहतात. यात अर्धचेतनावस्थेत सुप्त मनातुन जागृत मनात भाव-संवेदनाचे संवाहन सुरु झाले तेव्हा कविला प्रतिमा सुचली व जागे झाल्यावर लिहून काढली असे घडते. तथापि येथे प्रतिमानिर्मिती अर्धचेतनावस्थेतील मनाची प्रतिक्रिया ठरते.

[ग] काही वेळा कवी आपल्या काव्यतंद्रीतच मग्न राहून लेखन करीत असतो. भाव व प्रतिमा यांच्या मिलनातुन तो कविता प्रसवतो. या प्रतिमात स्वयंपूर्णता व संकलितता असते. यातील प्रतिमा अर्धजागृत मनोवस्थेत घडणा-या कल्पना व्यापारातुन निर्माण होतात.

[घ] निसर्गातील वस्तूंचे ज्ञान करुन घेण्याच्या आवश्यकतेतुन कित्येकदा प्रतिमानिर्मिती होते. अशी निर्मिती प्राथमिक काव्यात दिसते.

[च] टिका वाङ्‌मयात कल्पनेला प्रतिमानिर्मितीचे उगमस्थान मानले आहे. "कल्पना" शब्द इंग्रजीतील *Imagination* साठी प्रतिशब्द म्हणून वापरला आहे. "कल्प" [निर्माण करणे] या धातूपासून हा शब्द आला तर *Imagination* हा शब्द लॅटिन *Image* [प्रतिमा] पासून आला. [ *Imagination is the power of seeing images in thinks and making images out of them* ] कवीचे कल्पनाविश्व जेवढे समृध्द तेवढी प्रतिमासृष्टी विशाल व व्यापक ठरते.

वरील सर्व प्रतिमांतून काव्यात्म प्रतिमा कल्पनेच्या सहाय्याने कशा निर्माण होतात हे स्पष्ट दिसते. या सर्व प्रक्रिया आपणास अपरिचित नाहीत. प्रतिमेचा अभ्यास करताना या प्रक्रिया पाहिल्या की प्रतिमेचे किती

विविध पदर आहेत याची कल्पना येते. उत्कृष्ट प्रतिमा कोणत्या व निकृष्ट कोणत्या असाहि एक प्रश्न यावेळी वाचकांच्या मनात डोकावतो. अशावेळी या प्रतिमेचे काही निकष व गुणधर्म पडताळून पाहावे लागतात.

[१] प्रतिमा काव्य विषयाशी अनुरूप आहे की नाही ही गोष्ट प्रथम पाहावी लागते. अर्थात यात अंतर्गत अनुरूपता अधिक महत्वाची असते.

[२] कविता ज्या अनुभवातून निर्माण होते तो अनुभव व त्या अनुभवावर आधारित प्रतिमांची सुसंगती यांचा महत्व दयावे लागते. थोडक्यात यात सत्काराची सुसंगती साधणे आवश्यक असते.

[३] प्रतिमांच्यात सुसंगती निर्माण होण्यासाठी भावनिक औचित्य कितपत साधले आहे याचोही नोंद घ्यावी लागते. त्यामुळे त्यात परिणाम-कारकता येते.

[४] प्रतिमेतून वाचकांची पूर्वस्मृती सहजगत्या जागृत झाली पाहिजे हयासाठी आत्मनिष्ठ अभिरूचीचा निकष लावावा लागतो.

[५] प्रतिमेत ताजेपणा असावा लागतो. हा ताजेपणा म्हणजे अभिनव शब्दचित्राद्वारे जे वाचकांना जाणवले नाही ते जाणवून देण्याची प्रतिमेची शक्ती होय. ही शक्ती किंवा *Freshness* प्रतिमेत असला पाहिजे.

[६] वाचकाच्या भावनांना स्पर्श करण्याचे सामर्थ्य व उद्दिपित करण्याची तीव्रता प्रतिमेत जास्तीत जास्त हवी. तीव्रता हा प्रतिमेचा सर्वोत्कृष्ट गुण आहे.

[७] प्रतिमा आकर्षक, ठसठशीत हवी पण भडक नसावी.

[८] प्रतिमा आशयाशी अनुरूप आहे की नाही हे ही अभ्यासकांनी पहावे लागते. प्रतिमा व काव्यप्रकार यांचा समतोल साधल्याने येणारी काव्यातील प्रमाणबध्दता देखिल प्रतिमेचा निकष ठरते.

वरील निकष प्रतिमेच्या संदर्भात प्रामुख्याने लावले जातात. या सर्व निकषांवर घासून जी प्रतिमा कसोटीस उतरते तीच प्रतिमा सर्वश्रेष्ठ ठरते.

अर्थात या बाबतीत सखोल अभ्यास करण्यासारखा आहे. तथापि विषयाची मर्यादा व आशयाचे औचित्याचे भान ठेवून यात अधिक सखोल जाता येत नाही [अर्थात आपणास] सुधीर रसाळांनी प्रतिमेच्या संदर्भात बरच चर्चा करुन तिचे काही विशेष सांगितले आहेत. त्यांनी प्रतिमेच्या आंतररचनेवर भर दिलेला दिसतो. ते म्हणतात -

[अ] प्रतिमेला एक संवेदनांग असते. ती संवेदनांची रचना असते.

[ब] उच्चारचिन्हांनी निर्देशित होणा-या दोन वा अधिक मानसिक संदर्भामध्ये साधर्म्यवैधर्म्याधिष्ठीत आंतरप्रक्रिया होऊन प्रतिमा घडते हे साधर्म्य वैधर्म्य, संवेदना, मानसिक संदर्भ किंवा भावनांमधील असेल.

[क] प्रतिमा ही मूर्त गतिशील अनेकार्थी व ऐंद्रिय संघटना असून ती कवितेचा अपरिहार्य प्राथमिक घटक असते.

[ड] कवितेतील प्रतिमांची परस्पर संदर्भातील अर्थपूर्णता हा ही एक निकष ते मानतात.

## प्रतिमांचे वर्गीकरण -

प्रतिमांचे विविध पातळीवरुन वर्गीकरण करुन त्यांची गटवारी केली जाते. स्थितीशील व गतीशील किंवा बध्द व मुक्त प्रतिमा असे स्थूलमानाने प्रतिमेचे वर्ग केले जातात. बध्द प्रतिमा श्रुतिगत व स्नायुगत असते. मूकवाचनाने ती जागृत होते. पुरेशी पात्रता असणा-या वाचकांना ती सर्वत्र सारखीच जाणवते. तर मुक्त प्रतिमा चाक्षुष असते. व्यक्तीगणिक वेगवेगळ्या रुपात ती प्रभावी ठरते. ती स्वयमेव किती जिवंत आहे यावरुन नसून ऐंद्रिय संवेदनेशी विशिष्ट प्रकारे निगडित असणारी मानसिक घटना असते म्हणून यानंतर लुप्त प्रतिमा व उत्कट प्रतिमा असेही भेद केले गेले. लुप्त प्रतिमा स्वत:ला पूर्ण दृगोच्चरत्वाच्या पातळीखाली राखते. नेमके प्रक्षेपण व विशदत्व येऊ न देता ऐंद्रिय समूर्तांचे संसूचन करते. उत्कट प्रतिमा जर धार्मिक व मध्ययुगीन असेल

तर प्रसरणशील प्रतिमा भविष्यदर्शी व प्रगतीशील असते. अर्थात हे प्रतिमेचे ढोबळ वर्गीकरण झाले. याहीपुढे जाऊन प्रतिमेचे त्यातील वैशिष्टयानुसार वर्गीकरण केले जाते.

[अ] अलंकरण प्रधान [*Decorative* ] प्रतिमा - ही कल्पकता उपमा, रूपक, दृष्टांत यासारख्या अलंकारांचा उपयोग करते. तथापि परंपरेने प्राप्त झालेल्या अलंकारावरच ती अधिकाधिक अवलंबून असते. त्यामुळे ती इतर प्रतिमांपेक्षा काहीशी गौण ठरते.

[ब] भावनात्मक प्रतिमा - यात संवेदनशीलतेला महत्त्व असते. या भावनात्मक असतात. याचा विशेष म्हणजे या प्रतिमा वाचतांना कोणतेही स्पष्ट चित्र वाचकांसमोर येत नाही. फक्त अस्पष्ट भावछटा जाणवतात. या प्रतिमा महत्वाच्या मानल्या जातात.

[क] ओजप्रधान प्रतिमा - यात उदात्त विषय, असामान्य व अलौकिक भावनांचेच चित्रण केले जाते. कधी कधी यांच्याद्वारे उदात्त भावनेच्या पार्श्वभुमीवर एखादे व्यापक सत्य सूचीत केले जाते.

[ड] वस्तुप्रधान प्रतिमा - यात वास्तवाच्या दृढमांसल रेखांचे चित्रण असते. या वस्तूचित्रण उत्कृष्ट करतात.

[इ] घनात्मक प्रतिमा - अनुमतीची सखोल अभिव्यक्ती व कवीचे असामान्य चित्रण कौशल्य यात दिसते. या प्रतिमा चित्रकला व मूर्तीकला यांना जवळच्या असतात. यांचे सौंदर्य चित्रणकुशलतेत असते. एक आघाती, गहिरी अनुभुती, दृश्य आकारांना प्राधान्य व विशुध्द, गहिरी संवेदना यामुळे यात घनात्मकता येते. [ *Intensiveness* ]

[फ] विस्तारप्रधान प्रतिमा - यात भावनांचा प्रसार महत्त्वाचा असतो. प्रामुख्याने या महाकाव्यात वापरतात.

[ग] नादमय प्रतिमा - यात छंदाच्या नादसौंदर्याला महत्त्व असते. अशी प्रतिमा पदयबध्द काव्य रचनेत अधिक दिसते.

प्रस्तुत वर्गीकरण प्रतिमांच्या गुणधर्माधारे केले आहे. विषयानुरुप देखिल वर्गीकरण होऊ शकते. प्रतिक, पुराणकथा [ *Myth* ], रुपककथा [ *Allegory* ], दृष्टांतकथा [ *Parable* ], नीतीकथा [ *Fable* ], चिन्ह, अन्योक्तीकथा, कविसंकेत अशा विविध रुपात आपणास या प्रतिमा भेटत असतात.

सुधीर रसाळांची अलंकारीक व वक्तृत्वपूर्ण प्रतिमा, असंघटित प्रतिमा असे भेद केले आहेत. अलंकारीक प्रतिमा आशयाला सजवण्याचे, नटवण्याचे कार्य करते. मात्र आशय प्रतिमेहून वेगळा असावा लागतो. ही प्रतिमा विशिष्ट काव्यपरंपरेत व भाषिक समाजात सुंदर म्हणून मान्य असणा-या सामुग्रीतून घडते. वाचकाला जे सुंदर वाटते त्याचाच वापर यात केल्याने वाचकाच्या सुखद भावना चाळवतात व वाचकाचे रंजन होते. यात निर्मिती-पेक्षा क्रिडेला महत्त्व असते. ज्या गोष्टींना या प्रतिमा अलंकृत करतात त्याही रुढ व समाजमान्य असतात. कवीच्या स्वतःच्या संवेदनप्रकृतीचा अशा रचनेशी संबंध कमी असतो. [त्यादृष्टीने वसंत बापटांची "सेतू" कविता पाहण्याजोगी आहे] या प्रतिमा सौंदर्याच्या प्रचलित समजुतीच्या मर्यादा ओलांडीत नाहीत.

कधी कधी प्रतिमांचा उपयोग विचार स्पष्ट करण्यासाठी केला जातो. वैचारिक गदयातील उपमा, रुपके यात मोडतात. यात या प्रतिमा वक्तृत्वाचे साधन म्हणून आलेल्या असतात म्हणून त्यांना वक्तृत्वपूर्ण प्रतिमा असे म्हणतात. समाजात जे चांगले "शिव" म्हणून मान्य असते, ज्यावर समाजाच्या श्रध्दा असतात अशा गोष्टी यात प्रतिमा म्हणून वापरतात. या प्रयोजक असतात व प्रचारकी काव्यात विशेषत: वापरल्या जातात.

जेव्हा प्रतिमांचा एकमेकांशी मेळ बसत नाही अशा वेळी या प्रतिमा दुर्बोध बनतात. यांना असंघटित प्रतिमा म्हणतात. यांच्यामुळे कवितेचा तोल बिघडण्याचीही शक्यता असते.

प्रतिमांचे वैशिष्ठये व विषयानुसार होणारे वर्गीकरण पाहता प्रामुख्याने एक गोष्ट लक्षात येते ती प्रतिमांचे गुणधर्म, अंतरावलंबन साहित्याची बदलती सौंदर्यमूल्ये हे वर्गीकरणाचे प्रमुख आधार मानले गेले आहेत. वास्तविक पाहता असे वर्गीकरण करणे हे केवळ मुर्खपणाचे लक्षण आहे. मूठभर फुलं उधळावी व त्याच्या पिंजून टाकलेल्या पाकळ्यांवरती तासन तास भाष्य करावे असाच काहीसा हा प्रकार ठरतो. हात, पाय, तोंड, नाक हे जसे एकाच अखंड शरीराचे अवयव आहेत तद्वत या प्रतिमाही परस्परसंलग्न काव्यदेहाचे अवयव आहेत. यांचे वर्गीकरण करणे म्हणजे या काव्यदेहाची चिरफाड करण्यासारखे ठरते. अलंकारांवर भपकेबाज टिका करून प्रतिमेचे प्रकार शोधणे ही केविलवाणी व व्यर्थ गोष्ट आहे. तरीही अभ्यासकांनी स्वत:च्या सोयीकरता गुणधर्म प्रमाण मानून जे वर्गीकरण केले आहे त्याचे शास्त्रीय महत्व नाकारता येत नाही तथापि त्या सर्व प्रतिमा कवितेचे अविभाज्य अंग/ घटक आहेत हे विसरता येत नाही.

प्रतिमांच्या बाबतीत चर्चा करताना अन्यही काही गोष्टी विचारात घ्याव्या लागतात त्या म्हणजे -

प्रतिमा म्हणजे उपमान की उपमेय ? -

ब-याचदा प्रतिमेस उपमान की उपमेय ठरवायचे असा प्रश्न निर्माण होतो. ज्याचे वर्णन करावयाचे ते "उपमेय" व ज्या आधारे वर्णन केले जाते ते "उपमान". यापैकी नेमक्या कोणास प्रतिमा म्हणावयाचे अशी शंका अभ्यासकांनी उपस्थित केली. सर्वसामान्यत: उपमानांचा उल्लेख "प्रतिमा" म्हणून करतात व त्यासाठी "प्रतिमा" संज्ञेशी संलग्न असलेली "प्रतिमान" ही संज्ञाही वापरली जाते. तथापि ब-याचदा काही प्रतिमान "उपमान" म्हणून आलेल्या वस्तू वा घटना स्पष्ट नसतात. येथे उपमानाला प्रतिमा म्हणताना अडचण येते. खूपदा "उपमाना"प्रमाणे "उपमेय" ही स्पष्टपणे नमुद केलेले नसते. अशावेळीही तीच अडचण येते. एखादी प्रतिमा अनेक उपप्रतिमांच्या संयोगातून

घडते. अनेक प्रत्यक्षाप्रत्यक्ष उपमाने तिच्यात कार्यान्वित असतात. अशा वेळी उपमेय व उपमानापैकी एकाही घटकाला "प्रतिमा" म्हणून संबोधणे अयोग्य ठरते. जेव्हा प्रतिमेत एक वा अनेक संवेदनाकृती कार्यान्वित झालेल्या असतील, रुढार्थाने ज्याला उपमेय वा उपमान म्हणतात त्यापैकी एक वा दोन्ही घटक उपस्थित असतील त्याला महत्त्व न देता रूपक प्रक्रिया घडवणा-या शब्दसमूहास "प्रतिमा" म्हणणे इष्ट ठरते.

## उपमा व रूपकांचा प्रतिमेत अंतर्भाव -

बुपदा कवितेतील उपमांतही रूपक प्रक्रिया घडत असते व त्याचे कवितेतील कार्य हे रूपकांसारखे असते त्यामुळे कवितेत उपमा की रूपक आहे ही चर्चा टाळून वा दोहोंना समाविष्ट करून घेणारी "प्रतिमा" ही संज्ञा वापरणे योग्य ठरते. कारण उपमा व रुपकांना आवश्यक असणारे संवेदनाकृती व रूपक प्रक्रिया हे दोन्ही घटक प्रतिमेच्या संकल्पनेत अंतर्भुत होतात. "प्रतिमा" संज्ञेत उपमा व रूपक हे प्रकार अभिप्रेत असले तरी त्यांच्या रचनेचे तांत्रिक विशेष अभिप्रेत नसतात. केवळ संवेदनाकृती व रूपक प्रक्रियेचे विशेष अभिप्रेत असतात. तांत्रिक गोष्टी कवितेच्या विश्लेषणात व मूल्यमापनात गौण असतात. केवळ मूलभुत प्रक्रियेस यात महत्त्व असते म्हणूनच अलंकारशास्त्रातील तांत्रिक गोष्टींना महत्त्व देणा-या "उपमा व रूपक" संज्ञांचा स्वतंत्रोल्लेख टाळून त्यांना समाविष्ट करणारी "प्रतिमा" ही एकच संज्ञा स्वीकारणे शहाणपणाचे ठरते. मिडल्टन यरी याने या मताचा आग्रह धरला आहे.[१]

## प्रतिमेलाच प्राधान्य का ? व तिचे बदलते स्वरुप -

नवकाव्याचा खास विशेष म्हणून मर्ढेकर प्रतिमापरिततेचा उल्लेख करतात. पूर्वीच्या काव्यात बहुलत्वाने आढळणारे उपमा दृष्टांतादि अलंकार

---

१. पु. दि. धर्माधिकारी - "वाङ्मय सिध्दांत" प्रकरण १९ - पान ११९.

अंशत: प्रतिमेचे कार्य करीत अनुभवाला वेगळ्या पातळीवर नेऊन त्याच्या कक्षा रुंदावण्याच्या व संदर्भसूचकत्व वाढवण्याच्या कार्यात प्रतिमा सहाय्यभूत ठरते. अव्वल दर्जाच्या कवीला प्रतिमांचा आश्रय करावाच लागतो. किंबहुना कवित्वाचे ते महत्वाचे अंग ठरते.

प्रतिमांचे हे महत्त्व सनातन आहे. अर्थात पूर्वी प्रतिमेचे आजच्या इतके सहेतुक कौतुक होत नव्हते. प्रत्येक कवीला प्रतिमा असावी असा अट्टाहासही धरला जात नव्हता. मात्र आज प्रतिमेचे सामर्थ्य नव्याने जाणवल्याने अभ्यासकांनी "प्रतिमायोजन" हे काव्याचे महत्वाचे अंग मानले आहे.

पूर्वी अलंकारांच्या जोडीला समाननिष्ठा, समानमूल्ये, श्रध्दास्थाने, परंपरापूज्य प्रतिकांची योजना केली जात होती. आज यातले बरेच घटक कलाबाहय व कालबाहय झालेले दिसतात. परंपरागत प्रतिके थिटी पडलेली दिसतात. अशा स्थितीत कविगत प्रतितीस सावयवत्व व चैतन्यपूर्णत्व देण्यासाठी प्रतिमा योजनेस महत्व लागणे स्वाभाविक असते.

अलंकार योजना केल्यास प्रतिमेचे कार्य काही अंशी सिध्दीस जाते. पण त्यातील वस्तूव्यक्ती संबंध केवळ बाहय स्वरुपाचा राहतो. याउलट प्रतिमेचे असते. प्रतिमा अभिव्यक्तीशी जिव्हाळ्याने निगडित झालेली असते. उदा. बालकवींच्या "अरुण" कवितेतील एक उत्प्रेक्षेच्या जागी दुसरी आली तर फारसे बिघडत नाही. परंतु "फुलराणी" व "हिरवे गालीचे" थोडेही बदलता येत नाहीत. थोडक्यात प्रतिमा अंतर्मनाचा वेध घेते. बाहय वास्तवास अंतर्वास्तवाशी जोडून कोणतीहि अभिव्यक्ती संक्षिप्त व सामर्थ्यपूर्ण बनविण्यास मदत करते. वाचकांच्या नेणीवा ढवळून टाकते. जुन्याला नवे रुप देते. ती कालसापेक्ष व परिवर्तनशील असते. म्हणूनच आजकाल प्रतिमेला एवढे महत्त्व प्राप्त झाले आहे. किंबहुना आजचे अभ्यासक प्रतिमेशिवाय काव्याचे अस्तित्व मानावयास तयारच नाहीत असे दिसते.

## समारोप

प्रस्तुत प्रकरणात आपण प्रतिमेचा सखोल व सर्वांगिण विचार केला. प्रतिमेच्या स्वरुपापासून तिच्या संकल्पना, व्याख्या, वैशिष्टये, निकष, वर्गीकरण इ. सर्वांगाना ओझरता का होईना स्पर्श करण्याचा प्रयत्न आपण या प्रकरणात केला. त्यातून काही निष्कर्ष काढले तर काही मुदयांवर कांही नुसतीत चर्चा केली. प्रतिमेसंबंधी सर्वच गोष्टींचा उहापोह संशोधनाची मर्यादा व विस्तार भयापोटी विस्तृतपणे करता आलेला नाही. तथापि प्रतिमेची संकल्पना व तिचे स्वरुप लक्षात यावे इतपत प्रतिमेचा विचार या प्रकरणात निश्चितच केला आहे. क्वचित प्रसंगी एखादया मुद्याचा विस्तार अधिक झाला असला तरी त्याची अपरिहार्यता जाणून तो केला आहे. या सर्व विवेचनातून काही ठळक निष्कर्ष आपणास काढता येतात ते म्हणजे –

[१] प्रतिमेच्या ब-याच व्याख्या असल्या तरी त्या सर्व व्याख्यांचा संकलित विचार करुन एकच एक अशी सर्वसमावेशक व्याख्या करता येते. ती म्हणजे "संवेदयता, रुपकात्मकता, उत्कट भावना, काव्यात्मक वासना यांनी ओथंबलेले व कवीची अनुभूती वाचकांमध्ये संक्रमित करीत असताना संदर्भगत सापेक्षता, परस्परावलंबन घालून निर्माण होणा-या काव्यात्मक सत्याद्वारे रसिकांच्या चित्रवृत्ती आनंदित करणारे शब्दचित्र म्हणजे प्रतिमा होय".

[२] प्रतिमा हे काव्याचे अविभाज्य, अपरिहार्य अंग व व्यवच्छेदक लक्षण असून काव्याचे प्राणतत्व आहे.

[३] प्रतिमेसाठी प्रतिमान, कल्पनाचित्र, अनुभवचित्र, उपमान, प्रतिमाच्छाया, इमेज, प्रतिकृती असे अनेक प्रतिशब्द वापरले जातात.

[४] उपमा व रुपकांचा अंतर्भाव प्रतिमेतच केला जातो.

[५] काव्यात्मक सत्याविष्कार, संवेदनाचित्र, सौंदर्यानुभुती, परस्परावलंबित्व, संदर्भगत सापेक्षता हे प्रतिमेचे प्रमुख विशेष आहेत.

[६] पूर्वस्मृती जागृती, ताजेपणा, तीव्रता, अनुरुपता, ठसठशीतपणा, अर्थसंपन्नता हे प्रतिमेचे गुणधर्म आहेत.

[७] या गुणधर्मानुसार अलंकरण प्रधान, भावनात्मक, ओजसंपन्न, वस्तुप्रधान, घनात्मक, विस्तारप्रधान व नादप्रधान असे प्रतिमांचे वर्गीकरण केले जाते.

प्रस्तुत प्रकरणातुन उपरोक्त निष्कर्ष आपणास मिळतात. या प्रकरणाचा समारोप करण्यापूर्वी प्रस्तुत प्रबंधाशी प्रतिमेचा असणारा संबंध स्पष्ट करावा लागेल.

या शोध प्रबंधात आपण ज्ञानेश्वरीतील निसर्ग प्रतिमांचा अभ्यास करणार आहोत. तत्पूर्वी प्रतिमा म्हणजे नेमके काय हे समजणे गरजेचे आहे. प्रतिमेबाबत ब-याच संदिग्ध कल्पना अभ्यासकाच्या मनात दिसतात. प्रत्येक अभ्यासक स्वत:च्याच मताचा आग्रह धरतांना दिसतो. त्यामुळे नवख्या संशोधकांची ब-याचदा दिशाभूल होते. प्रतिमेच्या व्याख्यांच्या जंजाळातून त्याला नेमकी व्याख्या व स्वरुप समजणे कठिण जाते. तो गोंधळून जातो व अचूक निष्कर्षाप्रत यायचे सोडून तिथल्या तिथेच चाचपडत राहतो. "सात आंधळे व हत्ती"च्या दृष्टांतातील अंधांप्रमाणे तोही अल्पज्ञानावर निष्कर्ष काढण्यास प्रवृत्त होतो. म्हणूनच प्रतिमेची सांगोपांग नसली तरी आटोपशीर चर्चा करण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

पुढील प्रकरणात निसर्गातून या प्रतिमा कशा येतात. निसर्ग व मानवाचा अन्योन्य संबंध, काव्य व निसर्गातील नाते या मुदयांची आपण चर्चा करणार आहोत.

मनुष्याला निसर्ग ब-याच गोष्टींचे दान देत असतो. कवीही निसर्गा-पासून आपल्या प्रतिभेला अनेक विषय पुरवतात. याच निसर्गाच्या सहाय्याने आपली प्रतिमासृष्टी निर्माण करीत असतात. याच सा-याचा विचार पुढील प्रकरणात करावयाचा आहे.

## - संदर्भ ग्रंथ -


१] धर्माधिकारी पु. दि. - "वाङ्मयसिध्दांत" - अजब पुस्तकालय, कोल्हापूर १९७८.

२] गाडगीळ गंगाधर - खडक आणि पाणी - उत्कर्ष प्रकाशन, मुंबई १९८५

३] जोग रा. श्री. - मराठी वाङ्मयाभिरुचीचे विहंगमावलोकन - पुणे विदयापीठ प्रकाशन व्याख्यानमाला - १९५९.

४] कुलकर्णी गो. म. - नवसमीक्षा काही विचारप्रवाह - मेहता प्रकाशन, पुणे

५] कुलकर्णी गो. म. - रसग्रहण - कला व स्वरुप - कॉन्टि. प्रकाशन, पुणे १९७३.

६] मर्ढेकर बा. सी. - सौंदर्य आणि साहित्य - मौज प्रकाशन, मुंबई १९८७

७] मालसे स. गं. - अनुवादित साहित्य सिध्दांत - महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई प्र. आवृत्ती १९८२ - [मूळ लेखक रेने वेलेक व ऑस्टिन वॉरन - *Theory of Literature* ]

८] पवार गो. म., हातकणंगलेकर - संपा. -मराठी साहित्य प्रेरणा व स्वरुप - पॉप्युलर प्रकाशन, मुंबई - १९८६.

९] पाटील मालती - तुकारामाची प्रतिमासृष्टी व त्याच्या काव्यात्म शक्तीचे मूल्यमापन - नागपूर विदयापीठ, प्रकाशन १९७८.

१०] पाध्ये प्रभाकर - सौंदर्यानुभव - मौज प्रकाशन गृह, मुंबई - १९७९.

११] रसाळ सुधीर - कविता व प्रतिमा - मौज प्रकाशन गृह, मुंबई १९८२

१२] साखरे नानामहाराज - ज्ञानेश्वरी -सारथी प्रकाशन - पुणे

१३] अभिनय - वार्षिक नियतकालिक - कन्या महाविदयालय, मिरज - मधील " *Symbolism* " हा लेख - १९९२.